वाचले क्र –

१. मा. अंशकालीन प्राचार्य, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, द्वारा औद्योगिक संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ यांचेकडील पत्र क्र.औप्रसंपिंचि/शिप्रया/२०१८-१९, दि.२४/०८/२०१८.
२. माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील आदेश क्र. मातंवि/०२/कावि/१९८/२०२२ दि.१०/०१/२०२२ व आदेश क्र.मातंवि/०२/कावि/२३७/२०२२ दि.१५/०२/२०२२
३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व कासारवाडी यांचे जा/(.मु) औपसं. क्र.०१/कावि/२०८/२०२२, दि.१५/०६/२०२२ चे पत्र, दि.२०/०५/२०२२ व दि.१०/०६/२०२२ रोजीचे ई-मेल.
४. मा. अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील दि. १०/०८/२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र. मातंवि/१६/कावि/१५०/२०२२
दि.२२/०८/२०२२

विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम – १९६१ अंतर्गत "पासा" शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींच्या नेमणूकीबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींच्या "पासा" व्यवसायासाठी १०० जागा वाचले क्र. १ अन्वये मान्य आहेत. त्यानुसार उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोविड १९ चा वाढता प्रार्दुभाव रोखण्याकरीता लसीकरण केंद्रासाठी कोवीड-१९ पोर्टल/डॅशबोर्ड/आयसीएमआर पोर्टल वर माहिती अद्यावत करणेकामी आणि शासनाकडे सादर करणेत येणारा अहवाल तयार करणेचे डेटा एन्ट्रीचे कामकाज करणेकामी तातडीने शिकाऊ उमेदवाराच्या कोपा/पासा व्यवसायिक पदाकरीता एकूण उपलब्ध १०० जागांमधून २४ जागेवर यापूर्वीच नेमणूक करणेत आलेल्या आहेत. तसेच उर्वरित ७६ जागा उपलब्ध असल्याने वाचले क्र. ३ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व कासारवाडी यांनी एकूण ६८ प्रशिक्षणार्थींची यादी सादर केले होते. त्यातील एक प्रतिनिधीचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याने त्यास वगळून उर्वरित असे एकूण ६७ प्रशिक्षणार्थींची आरक्षित प्रवर्गनिहाय व टक्केवारीनुसार पात्र यादी तयार करणेत आलेली आहे.

**आरक्षण निहाय एकूण जागा**

**तक्ता (अ)**

| अ.क्र | विषय | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमा प्र | इमाव | आ.दु.घ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मान्यता प्राप्त कोपा-पासा जागा | १३ | ७ | ३ | ३ | ३ | २ | २ | १९ | १० | ३८ | १०० |
| २ | नेमणूक करणेत आलेल्या कोपा-पासा जागा | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | ६ | १ | ९ | २४ |
| ३ | **शिल्लक जागा** | **१०** | **५** | **२** | **२** | **२** | **२** | **२** | **१३** | **९** | **२९** | **७६** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत सन२०२२-२३ चे सत्राकरीता १०० जागांमधून उर्वरित ७६ जागा उपलब्ध असून त्यातील एकूण ४३ प्रशिक्षणार्थींची आरक्षित प्रवर्गनिहाय व टक्केवारीनुसार पात्र यादीस वाचले क्र. ४ अन्वये मा. अतिरिक्त आयुक्त (१) यांनी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे उमेदवारांची नेमणूक करणेत येत आहे.

<u>यादी क्र. १</u>

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अश्विनी शांताराम गायकवाड | SC | 85.33 |
| २ | कांचन धनराज कोल्हे | OBC | 84.67 |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | सचिन खंडू धाडवे | SC | 84.50 |
| ४ | अश्विनी रोशन यादव | SC | 84.17 |
| ५ | विपुल संतोष भागवत | OBC | 83.67 |
| ६ | सोनाली रुपेश टोके | OPEN | 83.17 |
| ७ | पियुष जनार्धन घसिंग | SC | 83.00 |
| ८ | ज्योती हरी पवार | SC | 82.83 |
| ९ | प्रणाली सुरेश मोरे | OPEN | 81.33 |
| १० | साहिल रज्जाक शेख | OPEN | 80.17 |
| ११ | श्रेयश सुधाकर जाधव | VJ.NT | 79.67 |
| १२ | प्रगती आनंद सोनावणे | SC | 78.17 |
| १३ | प्रिया रविंद्र दळवी | OBC | 78.17 |
| १४ | शोभाणा संतोष धोत्रे | OBC | 77.00 |
| १५ | प्रेम धनंजय पवार | OPEN | 75.83 |
| १६ | धनश्री बाबासाहेब लांडगे | SC | 74.17 |
| १७ | प्रणाली भगवान धनगर | HINDU DHANGAR | 73.67 |
| १८ | पूजा गोरक्ष मोहिते | NT 2 | 73.50 |
| १९ | अमिना मुर्तुजा शेख | OPEN | 73.33 |
| २० | प्रणिता श्रीराम भागवत | OPEN | 73.00 |
| २१ | सुशील शिवाजी पवार | VJ.NT | 72.83 |
| २२ | करण भारत जाधव | SC | 72.17 |
| २३ | करिश्मा दिपक काटकर | OBC | 71.67 |
| २४ | तहमिना हुसैन शेख | OPEN | 71.67 |
| २५ | प्रथम अरविंद धनावडे | OPEN | 70.50 |
| २६ | सृष्टि महेश कुंभार | OBC | 70.33 |
| २७ | अदिती धर्मेंद्र कसबे | SC | 70.17 |
| २८ | सोनाली नागनाथ मिटकरे | OPEN | 70.00 |
| २९ | भक्ती प्रकाश जंगम | OPEN | 69.67 |
| ३० | यश जालिंदर कुंभार | OBC | 69.17 |
| ३१ | विशाल कान्हु वाघोले | OBC | 68.00 |
| ३२ | सिद्धी भरत काणेकर | OBC | 67.50 |
| ३३ | अल्लामश मोहमदउमेर मणेर | OBC | 66.83 |
| ३४ | राज दयानंद ओव्हाळ | SC | 69.17 |
| ३५ | अक्षय कैलास पटेकर | SC | 68.83 |
| ३६ | सुकन्या विनोद दिवेकर | SC | 68.67 |
| ३७ | अभिषेक सुभाष अडागळे | SC | 68.33 |
| ३८ | प्रविण प्रभाकर आढाव | SC | 68.17 |
| ३९ | श्रेयश विनोद इनकार | SC | 67.33 |
| ४० | ओमकार कैलास घोलप | SC | 66.83 |
| ४१ | गणेश युवराज वाघमारे | SC | 66.00 |
| ४२ | ऋषिकेश अंबादास कांबळे | SC | 65.50 |
| ४३ | दमयंती हिरामण बाबर | SC | 65.00 |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोविड १९ चा प्रार्दुभाव रोखण्याकरिता लसीकरण केंद्रासाठी तसेच प्रत्येक रुग्णालय येथे कोविड १९ चे आयसीएमआर पोर्टल इत्यादी ठिकाणी, डॅशबोर्ड वर माहिती अद्यावत करणेकामी आणि शासनास देण्यात येणारा अहवाल तयार करणेचे डेटा एन्ट्रीचे कामकाजाकरिता व महापालिकेच्या कामाचा व्याप विचारात घेता प्रतिक्षाधीन यादी मधील एकूण २४ शिकाऊ उमेदवार यांची नेमणूक करणे आवश्यक असलेने वाचले क्र.४ अन्वये सदर प्रतिक्षाधीन यादीस मा. अतिरिक्त आयुक्त (१) यांनी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे उमेदवारांची नेमणूक करणेत येत आहे.

यादी क्र. २

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अरविंद सिंघ संधु | OPEN | 69.67 |
| २ | आशितोश शांताराम दोंडकर | OPEN | 69.17 |
| ३ | सोहेल शराफज खान | OPEN | 69.00 |
| ४ | देवकी हेमंत काकरे | OPEN | 68.17 |
| ५ | वैभव विजय पवळे | OPEN | 68.00 |
| ६ | अपुर्वा कालीदास तुपे | OPEN | 67.83 |
| ७ | कुणाल संतोष जाधव | OPEN | 67.83 |
| ८ | गणेश वासुदेव बहोत | OPEN | 67.83 |
| ९ | तबसुम रफिक सिध्दीकी | OPEN | 66.83 |
| १० | पूजा आनंद खरात | OPEN | 66.33 |
| ११ | महेंद्र यादव | OPEN | 66.00 |
| १२ | साक्षी उत्तरेश्वर सावंत | OPEN | 65.83 |
| १३ | मिसबा सत्तार मुल्ला | OPEN | 65.17 |
| १४ | प्रज्ञा प्रमोद सोनवणे | SC | 65.00 |
| १५ | शमिना रामजन जमादार | OPEN | 64.67 |
| १६ | मनिष आशिष सोळसे | SC | 64.67 |
| १७ | खुशी हिराचंद खुडे | SC | 64.00 |
| १८ | निखिल विनोद पवार | SC | 64.00 |
| १९ | कृष्णा सतीष कळसकर | OPEN | 63.83 |
| २० | सुजल राजेश कदम | SC | 63.50 |
| २१ | अभिषेक लक्ष्मण भोसले | OPEN | 63.50 |
| २२ | प्रतिक हनुमंत सोलसे | OPEN | 63.50 |
| २३ | कुणाल अनिल गायकवाड | OPEN | 61.83 |
| २४ | दुशांत चंद्रकांत लवंगे | SC | 57.67 |

सन २०२१-२२ चे सत्राकरिता "पासा" व्यवसायाचे पदावर प्रशिक्षणार्थी म्हणून एक वर्ष कालावधीसाठी उपरोक्त नमुद यादी क्र. १ व यादी क्र. २ मधील असे एकूण ६७ शिकाऊ उमेदवारांना नेमणुक देण्यात येत आहे.

सबब मी उप आयुक्त, माहिती व तंत्रज्ञान विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८ या आदेशान्वये ७६ मधील रिक्त जागेवर वरील एकूण ६७ प्रशिक्षणार्थींना "पासा" या व्यवसायासाठी सन २०२२-२३ या सत्राकरीता उमेदवारांना रुजू दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरीता प्रशिक्षण कालावधीमधील अटी व शर्ती बंधनकारक राहून एकूण र.रु. ७७००/- (अक्षरी रक्कम रुपये सात हजार सातशे) चे विद्यावेतन अदा करणेस मान्यता देत आहे.

उपरोक्त नमुद निवड करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींना खालील अटी व शर्तींच्या आधारे नेमणूक करणेत येत आहे.

१. उरोक्त नेमणूक करणेत आलेल्या उमेदवारांनी आदेशाच्या दिनांकापासून ७ (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) दिवसाच्या आत माहिती व तंत्रज्ञान विभागात रुजू होणे बंधनकारक आहे अन्यथा सदर नियुक्ती रद्द करणेत येईल.

२. केंद्रशासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिकाऊ उमेदवारांना एकूण र.रु. ७७००/- इतके विद्यावेतन अनुज्ञेय राहील. तसेच सदर उमेदवारांची विभागाअंर्तगत बदली करणेचा हक्क माहिती व तंत्रज्ञान विभागास राहिल.

३. apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) वर उमेदवाराने स्वत:ची वैयक्तीक, शैक्षणिक माहिती (Profile) अद्ययावत (Update) करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरची नेमणूक ही उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता आय.टी.आय उत्तीर्ण तसेच शाळेचे, जातीचे, आधारकार्ड, apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) पोर्टलवरील रजिस्ट्रेशन इत्यादी प्रमाणपत्राच्या छायांकित सत्यप्रती तपासून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास तसेच प्रशिक्षणार्थींनी आदेशातील अटी व शर्तींचा भंग केल्यास देण्यात आलेली नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

४. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणाची वेळ ही संबंधित कार्यालयाचे वेळेप्रमाणे राहील व उमेदवारांना शिफ्टमधील कामकाज देता येणार नाही तरी कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही. नेमणूक दिलेल्या व्यवसाय निहाय पदाचेच काम करणे बंधनकारक राहील अन्य कोणतेही कामकाज करता येणार नाही. तसे झाल्यास उमेदवार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार दाखल करु शकतील.

५. उमेदवारांनी नेमणूक दिलेल्या विभागात रुजू झाल्यानंतर स्वत:चे ओळखपत्र तसेच बँक पासबुक दोन दिवसात प्राप्त करुन संबंधित विभागास सादर करावे. त्याचप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून थंम्ब मशिनवर नोंद करुन घ्यावी. आपल्याला देण्यात येणारे विद्यावेतन थंम्ब रिपोर्टवरुन अदा करण्यात येणार असल्याने कार्यालयीन वेळेतच कार्यालयामध्ये उपस्थित रहावे व कार्यालयीन वेळेनंतरच कार्यालय सोडणे बंधनकारक राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

६. शिकाऊ उमेदवारांना पुर्ण वर्षाकरीता ०८ दिवस किरकोळ रजा व १५ दिवस वैद्यकीय रजा तसेच सर्व शासकीय सुट्ट्या अनुज्ञेय राहतील. उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणूक आढळून आल्यास नियमाधीन कार्यवाही करणेत येईल.

७. शासकीय कार्यालयात कामकाज करत असताना इकडील माहितीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील. शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेणेत येईल.

८. शिकाऊ उमेदवारास नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. या कालावधीत कोणतीही तात्पुरत्या स्वरुपातील नोकरी इतरत्र करता येणार नाही. प्रशिक्षणार्थी म्हणून या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक पूर्णत: तात्पुरती, एक वर्ष अशा निश्चित कालावधीसाठी आहे. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात येईल व त्यासंबंधीत कोणताही हक्क राहणार नाही.

९. शिकाऊ उमेदवारांची संविदा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, निगडी, पुणे-१९ यांचे कार्यालयात कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन (रजिस्ट्रेशन) नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास त्यांची नेमणूक त्वरीत रद्द होऊन त्यांना परिक्षेस बसण्यास अडचण निर्माण होऊ शकते. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे यांचे आदेशानुसार उमेदवारांना कार्यमुक्त करण्यात येईल, याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) संकेतस्थळावर करार नोंदणी केलेनंतर करार कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात आणता येणार नाही.

१०. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे-१९ यांत्रेमार्फत होणा-या परिक्षेस बसण्यास आवश्यक कागदपत्रांची तसेच परिक्षा फी ची पुर्तता संबंधित उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे. त्याकरीता apprenticeshipindia.gov.in (NSDC PORTAL) या संकेतस्थळावर माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे दरमहाची हजेरी पत्रकावरील उपस्थिती व विद्यावेतन जमा झालेल्या बँक पास बुकची छायांकित प्रत संबंधित शाखाप्रमुखांचे स्वाक्षरीने माहिती व तंत्रज्ञान विभागास सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव परीक्षेस बसता आले नाही तर त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

११.नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थीचा कालावधी समाप्त करण्याचा अधिकार राहील.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
**माहिती व तंत्रज्ञान विभाग**
**पिंपरी चिंचवड महागनरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति,

व्यवसाय निहाय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्यात आलेले सर्व संबंधित उमेदवार यांचे माहितीकरिता सदरचा आदेश महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येईल.

प्रत- १. लेखा विभाग
२. संबंधित विभाग

शिकाऊ उमेदवारांना प्रत्येक महिन्याचे ०५ ताखेपुर्वी बायोमेट्रीक थंब हजेरी प्रमाणे विद्यावेतन त्यांचे बँक खात्यामध्ये जमा केल्याचा पुरावा म्हणून बँक पासबुकची प्रत व बायोमेट्रीक हजेरीची छायांकीत प्रत शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांचे स्वाक्षरीने माहिती व तंत्रज्ञान विभागास सादर करावी. सदरची माहिती दर महिन्याचे ०५ तारखे पर्यंत सादर न केल्यास अथवा विलंबाने सादर केल्यास शासनाकडून मिळणा-या परताव्याच्या रक्कमेची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील. प्रशिक्षणार्थींना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देण्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. व्यवसाय निहाय प्रशिक्षण देण्यात यावे त्यांच्यावर इतर कामे सोपविण्यात येऊ नयेत. प्रशिक्षणार्थींनी याबाबत मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार केल्यास संबंधित जबाबदार राहतील. प्रशिक्षणार्थी सतत गैरहजर राहिल्यास तसेच कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्यास त्यांचेवर विभागप्रमुखांनी कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची प्रत माहिती व तंत्रज्ञान विभागास सादर करावी. कार्यालयात उशीरा हजर राहील्यास नियमानुसार रजा खर्ची टाकण्यात याव्यात. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या एक महिन्यापूर्वी प्रशिक्षणार्थींची संपूर्ण वर्षाची उपस्थिती व विद्यावेतन यांचे बँक खात्यावर जमा झाल्याच्या पासबुकची छायांकीत प्रत आपले स्वाक्षरीसह माहिती व तंत्रज्ञान विभागास सादर केल्याची खात्री करावी अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता न आलेस सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील.

मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कालावधी निश्चित केलेनुसार प्रशिक्षणार्थींना महापालिकेत नेमणूक दिलेल्या त्यांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना विभागामार्फत कार्यमुक्त करण्यात यावे. उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित असल्याने त्यांच्या कालावधीत वाढ होणार नाही याची खबरदारी घेऊन कालावधीत वाढ करणेबाबतचे प्रस्ताव/पत्रव्यवहार सादर करु नयेत.

४. मा. अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र,
द्वारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, टेल्कोरोड, निगडी पुणे – ४११ ०१९.
यांना माहितीकरीता सादर.